रे.के.नं. १३५/२०१७

नि.क्र. २८/क

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | विनोद मधुकर निकम. |
| वय | – | ३८ वर्षे |
| व्यवसाय | – | नोकरी, |
| राहणार | – | कामोठे, नवी मुंबई. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. नाईक यांच्यामार्फत...**

१. दिनांक ०७.०३.२०१७ रोजी मी ओम श्रीगणेश कंटेनर्स या कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून कामास होतो. दिनांक ३१.०१.२०१७ रोजी आम्ही धुळे येथे ५ ट्रेलर पाठवले होते. त्यामध्ये सोयाबीनचा भुसा भरुन न्हावाशेवा येथे आणण्यात आले. ते कंटेनर जीपीआय पार्कींग येथे लावण्यात आले. दिनांक ०७.०२.२०१७ रोजी कंटेनर जहाजाद्यारे कोलंबोला गेले. साधारण एका महिन्याने आमच्या कार्यालयाने काही कंटेनरमधून अंदाजे ८ ते ९ टण माल कमी गेल्याचे सांगितले. त्या कंटेनरचे नंबर मला सांगता येणार नाही. त्यापैकी एमएच ४६ एएफ ८८०० यावर चालक चमकोर सिंग हा चालक होता. एमएच ४६ एएफ ७७०० यावर चालक सरबजित हा चालक होता. इतर कंटेनरचे चालक व नंबर मला आठवत नाही. त्यांना विचारणा केली असता त्याने माल चोर–याचे सांगितले. त्यामुळे मी फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर मला माहित आहे. **फिर्याद नि.क्र.**

**२९** वर आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो.

सरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (विकास डी. बडे)

दिनांक – ०२.०९.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

रे.के.नं. १३५/२०१७

नि.क्र. ३०/क

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | राजेश विठ्ठलदास छागानी |
| वय | – | ५२ वर्षे |
| व्यवसाय | – | चालक |
| राहणार | – | जासई, ता. उरण, जि. रायगड. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. नाईक यांच्यामार्फत...**

१. दिनांक ०७.०३.२०१७ रोजी पोलिसांनी मला पोलिस ठाण्यात बोलावले होते. तेथे राजू नावाचा इसम हजर होता. त्याने चोरीचा विकत घेतलेला माल एपीएमसी मार्केटमधील गोडावून मध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यावरुन त्याचे निवेदन नोंदवण्यात आले. ते आता मला दाखवण्यात आले. त्यातील मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. निवेदन **नि.क्र. ३१** वर आहे. तेथून आम्ही आरोपीने सांगितलयाप्रमाणे पोलिस जीपने एपीएमसी मार्केट येथे गेलो. तेथे आरोपीने गोडावून दाखवले. तेथून ५० गोणी मुददेमाल जप्ती पंचनामा करुन जप्त केला. तो आता मला दाखवण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. तो **नि.क्र. ३२** वर आहे. मी आरोपीला ओळखू शकत नाही. मी जप्त मुददेमाल ओळखू शकतो.

सरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (विकास डी. बडे)

दिनांक – ०२.०९.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

रे.के.नं. १३५/२०१७

नि.क्र. ३३/क

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ याची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | रुपेश पांडुरंग कागीणकर |
| वय | – | ३८ वर्षे |
| व्यवसाय | – | नोकरी, |
| राहणार | – | खारेगाव, ठाणे |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. नाईक यांच्यामार्फत...</u>**

१. दिनांक ११.०३.२०१७ रोजी मी ओम श्रीगणेश कंटेनर्स या कंपनीमध्ये सुपरवायजर म्हणून कामास होतो. दिनांक ३१.०१.२०१७ रोजी आम्ही धुळे येथे ५ ट्रेलर पाठवले होते. त्यामध्ये सोयाबीनचा भुसा भरुन न्हावाशेवा येथे आणण्यात आले. ते कंटेनर जीटीआय पार्कींग येथे लावण्यात आले. दिनांक ०७.०२.२०१७ रोजी कंटेनर जहाजाद्यारे कोलंबोला गेले. साधारण एका महिन्याने आमच्या कार्यालयाने काही कंटेनरमधून अंदाजे ८ ते ९ टण माल कमी गेल्याचे सांगितले. त्या कंटेनरचे नंबर मला सांगता येणार नाही. त्यापैकी एमएच ४६ एएफ ८८०० यावर चालक चमकोर सिंग हा चालक होता. एमएच ४६ एएफ ७७०० यावर चालक सरबजित हा चालक होता. इतर कंटेनरचे चालक व नंबर मला आठवत नाही. त्यांना विचारणा केली असता त्याने माल चोरल्याचे सांगितले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकत नाही.

सरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत

(विकास डी. बडे)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

उरण,
दिनांक – ०२.०९.२०२४